॥ तमसो मा ज्योतिर्गमय ॥

सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित

**श्रीमती. मणिबेन. एम. पी शाह कला आणि वाणिज्य महिला स्वायत्त महाविद्यालय, माटुंगा**

मराठी विभाग प्रकाशित ई-नियतकालिक

# पालवी

## नव चैतन्य



वर्ष ३, अंक ३

मे २०२५

# संपादकीय



ज्ञानदीप प्रज्वलित करणाऱ्या संस्थांमध्ये सेवा मंडळ सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय हे पहिले तेजस्वी महिला महाविद्यालय आहे. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरशी महिला विद्यापीठाशी संलग्न असलेले हे महाविद्यालय गेली ६८ वर्षे महिलांच्या शैक्षणिक सक्षमीकरणाचा वसा अभिमानाने पुढे नेत आहे. UGC ने बहाल केलेला College with Potential for Excellence हा दर्जा आणि 'महर्षी कर्वे उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार २०१७-१८' हे यश आपल्या कार्यक्षमतेचे साक्षीदार आहेत.

'शिक्षणाच्या माध्यमातून महिलांना सक्षम, आत्मनिर्भर व जबाबदार नागरिक घडविणे' हे आमचे ब्रीदवाक्य प्रत्येक उपक्रमातून जणू साकारते आहे. याच ध्येयाने प्रेरित होऊन, महाविद्यालयातील मराठी विभाग विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव कटिबद्ध आहे. फक्त पुस्तकी ज्ञानापुरते न थांबता, विद्यार्थिनींमध्ये साहित्यिक अभिरुची, चिंतनशीलता व व्यक्तिमत्त्व विकास घडवण्यासाठी शारदोत्सव व्याख्यानमाला, विविध कार्यशाळा, चर्चासत्रे, शोधनिबंध सादरीकरण, साहित्य संमेलने अशा विविध उपक्रमांचे आयोजन करीत असते.

मराठी विभागाचा एक सुंदर सर्जनशील प्रयत्न म्हणजे 'पालवी' ई-नियतकालिक. २०२२-२३ मध्ये रुजलेल्या या कल्पनेने आज वटवृक्ष व्हावं, अशा आशयाने विद्यार्थिनींच्या मनातील कोमल, प्रगल्भ भावनांना व्यक्त होण्याचे व्यासपीठ मिळाले आहे. २०२४-२५ च्या या तिसऱ्या अंकात विद्यार्थिनींनी आपल्या लेखणीने कविता, कथा, ललित लेख यांच्या माध्यमातून जीवनाचे विविध रंग रसपूर्णतेने रेखाटले आहेत. 'कल्पनांचे पंख पसरले की सृजनाचा नभोमंडळ व्यापले जाते.' अशीच उंच भरारी घेण्याचा प्रयत्न म्हणजे 'पालवी' हे आमचे ई-नियतकालिक! विद्यार्थिनींच्या कोमल भावविश्वाला स्पर्श करणाऱ्या या अंकामध्ये कल्पनाशक्ती, विचारशक्ती आणि अभिव्यक्तीचे सुंदर प्रतिबिंब उमटले आहे. लेखणीच्या माध्यमातून विद्यार्थिनींनी मनातील अनुभव, विचार आणि भावना अत्यंत प्रभावीपणे मांडल्या आहेत. या साहित्यिक प्रवाहाला दिशा देणाऱ्या मराठी विभाग प्रमुख डॉ. रश्मी शेट्ये तुपे आणि प्रा. सुप्रिया शिंदे यांचे मनःपूर्वक अभिनंदन ! त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींचे व्यक्तिमत्त्व फुलत राहो, त्यांच्या सर्जनशीलतेला बहर येवो, हीच सदिच्छा !



**डॉ. अर्चना पत्की**
**प्राचार्य**

पालवी
नव चैतन्य

# संपादकीय मंडळ



डॉ. अर्चना पत्की

डॉ. रश्मी शेटये तुपे

प्रा. सुप्रिया शिंदे

कु. तन्वी ठाकूर

कु. दुर्गा जोगदंड

कु. मनाली मणचेकर

कु. गीतांजली पोळ

कु. ऋतुजा ढवळे

'पालवी' या अंकातील लेखन विद्यार्थिनींच्या वैयक्तिक विचारांची अभिव्यक्ती आहे. संपादक मंडळ त्या प्रत्येक मताशी सहमत असतीलच असे नाही.

वर्ष ३, अंक ३, मे २०२५

पालवी
नव चैतन्य

# अनुक्रमणिका


| अनु क्र. | विषय | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| १ | माझे आवडते पुस्तक : श्यामची आई – ऋतुजा वरपे | ४ |
| २ | कॉलेजचे दिवस – तन्वी कोंडे | ५ |
| ३ | मी अनुभवलेला पाऊस – प्रणाली जगताप | ६ |
| ४ | आयुष्य खूप सुंदर आहे – अश्विनी चव्हाण | ७ |
| ५ | निसर्ग माझा खरा मित्र – कीर्ती नातेकर | ८ |
| ६ | माझा एलिफंटा लेणीचा प्रवास – संघमित्रा पडवणकर | ९ |
| ७ | माझा आवडता लेखक : चेतन भगत– गुंजल पाटील | १० |
| ८ | मराठी संतांचे सामाजिक कार्य – मृणाली सर्वेकर | ११ |
| ९ | मानसा मानसा कधी व्हशील मानुस ... – प्रा. नेहा भोसले | १२ |
| १० | चारोळ्या – प्रा. सतीश पवार | १३ |
| ११ | मला पडलेलं स्वप्न – पायल रामुंगडे | १४ |
| १२ | स्त्रियांचे आत्मचरित्रपर लेखन – तन्वी ठाकूर | १५ |
| १३ | जगणे – भूमी लोखंडे | १७ |
| १४ | ओळख – तन्वी देवळे | १८ |
| १५ | राजा शिवछत्रपती – गीतांजली पोळ | १९ |
| १६ | सोनेरी पानं – दुर्गा जोगदंड | २० |
| १७ | शेवटचं वर्ष – हिना कादिर | २१ |
| १८ | मराठी विभागातील उपक्रम | २१ |


**प्राणाहून अधिक प्रिय मराठी | आमची अस्मिता आहे मराठी |**
**महाराष्ट्राची ओळख भाषा मराठी | मराठी माणसाचा स्वाभिमान आहे मराठी |**


# माझे आवडते पुस्तक
# श्यामची आई

**ऋतुजा तुकाराम वरपे**
द्वितीय वर्ष वाणिज्य बॅफी विभाग



श्यामची आई हे पांडुरंग सदाशिव साने, म्हणजेच साने गुरुजी यांनी लिहिलेले एक अजरामर आणि हृदयस्पर्शी साहित्यकृती आहे. मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेत या पुस्तकाचे स्थान अत्यंत मानाचे आहे. साने गुरुजींनी या पुस्तकात त्यांच्या बालपणीच्या आठवणी आणि त्यांच्या आईचे व्यक्तिचित्रण अत्यंत संवेदनशीलपणे मांडले आहे.याकथेत श्याम नावाच्या एका लहान मुलाचे आणि त्याच्या आईचे प्रेमळ, सुसंस्कृत आणि संस्कारक्षम नाते उलगडले गेले आहे. श्यामची आई ही केवळ एक माता नसून ती एक शिक्षिका, स्त्री आणि मार्गदर्शिका आहे. तिच्या साध्या परंतु अर्थपूर्ण शिकवणीमुळे श्यामला जीवनातील उच्च मूल्यांची जाणीव होते. तिचीमाया, त्याग, कष्टाळूपणा आणि मुलांवरील प्रेम यांचे प्रभावी चित्रण या पुस्तकात आढळते.या पुस्तकाची भाषा अत्यंत सरळ, साधी आणि हृदयाला भिडणारी आहे. संवादां मधून एक प्रकारची आत्मिक जिव्हाळ्याची भावना निर्माण होते, त्यामुळे वाचकाला हे पुस्तक आपलेसे वाटते.

श्यामची आई ही एक प्रेरणादायी कथा आहे जी वाचकांच्या मनामध्ये दीर्घकाळ टिकून राहते.हे पुस्तक मला नेहमीच जीवनातील मूल्यांची – प्रेम, त्याग, निष्ठा आणि कुटुंबातील बंध यांची जाणीव करून देते. हीकथा केवळ एका आईच्या आयुष्याचा आरसा नसून प्रत्येक वाचकाला अंतर्मुख करणारी, विचार प्रवृत्त करणारी आणि सकारात्मकतेची प्रेरणा देणारी आहे.अशा प्रकारची साहित्यसंपदा ही आपल्या जीवनातील अमूल्य संपत्ती ठरते. चांगल्या पुस्तकांच्या सहवासाने आपले विचार अधिक समृद्ध होतात. साने गुरुजींचे श्यामची आई हे असेच एक अपूर्व पुस्तक आहे, जे मला विशेष भावते आणि नेहमीच नव्या दृष्टिकोनाची जाणीव करून देते.



# कॉलेजचे दिवस

तन्वी कोंडे
प्रथम वर्ष अर्थशास्त्र विभाग



मी तन्वी कोंडे. माझ्या कॉलेचच्या आयुष्यात मला खूप सुंदर मित्रमैत्रिणी मिळाल्या – पायल , अनिषा , शिफा , सादिया आणि जोहा.आम्ही सर्व एकत्र खूप मजा करत असू. अभ्यासाच्या जोडीने आम्ही सहली, सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा आणि अनेक आठवणींच्या गोष्टी एकत्र अनुभवल्या.माझा अर्थशास्त्र विषय असल्यामुळे आम्ही अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थिनींनी अर्थोत्सव या एका कार्यक्रमाचे आयोजन जानेवारी महिन्यात केले होते. ज्यात विद्यार्थिनींनी विविध खाण्याच्या पदार्थांचे स्टॉल लावले होते वेगवेगळे गेम्स याच्या माध्यमातून विद्यार्थिनींना बाहेरच्या जगात बिझनेस करायचा असेल तर कोणत्या कोणत्या गोष्टी लागतात याचे ज्ञान मिळाले या कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांसोबत प्राध्यापक आणि प्राचार्यांनी सुद्धा आनंद लुटला त्यामुळे मला खूप छान वाटले. तसेच माझा ग्रीन क्लब हा विषय असल्यामुळे मी अनेक ठिकाणी व्हिजिट साठी गेले जात विक्रोळी मॅगरुझ गार्डन, गोरेगाव आरे कॉलनी मधील सीड कलेक्शन अशा अनेक गोष्टी पाहता आल्या शिकता आल्या या सगळ्या महाविद्यालयातल्या आठवणी कायम माझ्या सोबत राहतील.कॉलेजचे दिवस हे प्रत्येकाच्या आयुष्यातील अतिशय खास आणि अविस्मरणीय क्षण असतात. हे दिवस म्हणजे जीवनाच्या एका नव्या पर्वाची सुरुवात असते. शाळेतील शिस्तबद्ध जीवनानंतर कॉलेजचे मोकळे वातावरण, नवीन मित्रमैत्रीणी, नवनवीन अनुभव यामुळे या दिवसांचे महत्त्व अधिकच वाढते.कॉलेज मध्ये प्रवेश घेतल्यावर आपल्याला नवीन शिक्षक, नवीन अभ्यासक्रम आणि एक नवे सामाजिक वर्तुळ मिळते. हळूहळू आपले मित्रमैत्रिणी बनतात, ग्रुप तयार होतो आणि नकळत अनेक आठवणींचा खजिना भरू लागतो. कॉलेज मध्ये झालेली गॅदरिंग, स्पर्धा, पिकनिक, प्रेझेंटेशन, प्रोजेक्ट्स हे सर्व अनुभव केवळ शिक्षणापुरते मर्यादित राहत नाहीत, तर ते व्यक्तिमत्व घडवण्यात मोठी भूमिका बजावतात.

कॉलेजचे हे दिवस केवळ अभ्यासापुरते मर्यादित नसतात. इथे आपण अनेक वेळा अपयशाचा सामना करतो, चुका करतो, पण त्या चुकांतूनच शिकतो. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मित्रांचे पाठबळ यामुळे आपण हळूहळू प्रगल्भ होत जातो. या दिवसांमध्येच आपल्याला आपल्या छंदांना चालना देण्याची संधी मिळते. कोणीतरी कविता लिहायला लागतो, कोणी नाटकात अभिनय करतो, तर कोणी वक्तृत्वात चमकतो. कॉलेजचे दिवस म्हणजे एक आनंदाची पर्वणीच असते. कधी अभ्यासाचा ताण असतो, तर कधी परीक्षा संपल्यावरचा निखळ आनंद. शेवटी हे दिवस संपतात, पण त्याच्या आठवणी मात्र आयुष्यभर मनात घर करून राहतात.कॉलेज मध्ये घालवलेले हे क्षण केवळ सण-समारंभ किंवा अभ्यासापुरते मर्यादित नसतात, तर हे दिवस आपल्याला जबाबदारीची जाणीव करून देतात. अनेक वेळा विविध संघटनांमध्ये काम करताना नेतृत्वगुण विकसित होतात. ग्रुप प्रोजेक्ट्सच्या निमित्ताने सहकार्य, वेळेचे व्यवस्थापन आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य आत्मसात होते. या काळात आपण स्वतःला आणि आपल्या क्षमतांना ओळखतो. या काळातच काही नाती इतकी घट्ट होतात की ती आयुष्यभर टिकून राहतात. याच मैत्रीणी पुढे जिवाभावाचे सख्या होतात. कॉलेज संपल्यावर प्रत्येक जण वेगळ्या वाटेने जातो, पण कॉलेजमध्ये घालवलेले क्षण कायम स्मरणात राहतात. या आठवणी आपल्याला कधी हसवतात, कधी डोळे पाणावतात, पण प्रत्येक वेळी त्या काळात पुन्हा एकदा जाऊन येतो असे वाटते.कॉलेजचे दिवस म्हणजे अनुभवांची शाळा, स्वप्नांची उड्डाणे आणि आयुष्याच्या प्रवासाची सुरुवात. हे दिवस पुन्हा कधीच परत येत नाहीत, म्हणूनचया क्षणांचा मनमुराद आनंद घेणे आवश्यक असते.

# मी अनुभवलेला पाऊस

**प्रणाली जगताप**

द्वितीय वर्ष वाणिज्य विभाग



पावसाळा हा ऋतू प्रत्येकाच्या आयुष्यात आनंद घेऊन येतो. निसर्गाच्या सान्निध्यात हिरवळ नटते, झाडाझुडपां मध्ये नवचैतन्य निर्माण होते आणि सर्वत्र ताजेपणा पसरतो. प्रत्येक जण पावसाची आतुरतेने वाट पाहत असतो, कारण पावसाच्या आगमनाने वातावरणात एक वेगळीच ऊर्जा निर्माण होते. माझ्या आयुष्यातही पावसाला एक विशेष महत्त्व आहे. आज मी अशाच एका पावसाळी दिवसाच्या आठवणी शेअर करणार आहे, ज्याने मला भावनिकदृष्ट्या स्पर्श केला.एका उष्ण आणि दमट दिवशी मी बाजारात गेले होते. प्रचंड उन्हामुळे मी पूर्णपणे घामाने भिजले होते आणि मनात थंड पाण्याच्या घोटाची आस होती. म्हणून मी जवळच्याच एका दुकानात थांबून थंड पाण्याची बाटली घेतली आणि ती प्यायली. मात्र, तरीही गरम वातावरणामुळे अस्वस्थता जाणवत होती. काही क्षणांतच आकाशात काळे ढग जमू लागले आणि अचानक मुसळधार पाऊस सुरू झाला.पावसाच्या त्या थंडगार सरींनी वातावरण प्रसन्न केले. मनात पावसात भिजण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. मी दुकानातून एक प्लास्टिकची पिशवी घेतली आणि त्यात माझा मोबाईल व पर्स ठेवली. नंतर मी बेधडकपणे पावसात भिजू लागले. पावसाच्या थेंबांनी मन आनंदित झाले; जणू काही निसर्गाशी एकरूप झाल्याचा अनुभव आला. दिवसभरअसंच भिजत राहावं, असं वाटत होतं.पण नंतर घराकडे निघणे गरजेचे वाटले. पावसाच्या सरी अजूनही थांबत नव्हत्या. वाटेत मला एक अपंग व्यक्ती दिसली, जो त्या पावसात पूर्णपणे भिजलेला होता आणि थंडीने थरथरत होता. त्याला पाहून माझं मन हेलावलं. मी जवळच्याच दुकानातून त्याच्यासाठी गरम कपडे विकत घेतले आणि त्याला दिले. त्याने ते कपडे घातले आणि मला आशीर्वाद दिला. त्याच्या चेहऱ्यावरचे ते समाधान आणि हास्य माझ्या मनात कायमचं कोरलं गेलं.तो क्षण माझ्या आयुष्यातील सर्वात सुंदर आणि स्मरणीय क्षणांपैकी एक होता. त्यादिवशी पावसामुळे मला एका गरजू व्यक्तीला मदतीचा हात देता आला, ही भावना खूप समाधान देणारी होती. हा अनुभव मला आयुष्यभर प्रेरणा देणारा ठरला आहे. कधीकधी निसर्ग आपल्याला अशा संधी देतो, ज्या आपल्याला खऱ्या अर्थाने माणूस बनवतात.

# आयुष्य खूप सुंदर आहे

**अश्विनी चव्हाण**
द्वितीय वर्ष मराठी विभाग



आयुष्य हे देवाचं एक सुंदर देणं आहे. ते अमूल्य आहे, अनमोल आहे. प्रत्येक क्षणात काही तरी नवीन शिकायला, अनुभवायला मिळतं आणि यामुळेच आयुष्य अधिक सुंदर वाटतं.

थोडंसं हसणं, थोडंसं रडणं,
कधी स्वप्नांचं, कधी वास्तवाचं पिढणं
हेच तर आयुष्याचं खरं गमक,
कधी गोड, कधी कडवट – पण शिकवण प्रत्येक क्षणाचं
वाचावं खोलवर, अनुभव घ्यावा मनापासून,
कारण पुन्हा मिळणार नाही हाच क्षण

आयुष्यात आनंद, दुःख, यश, अपयश या सगळ्या भावना अनुभवायला मिळतात. प्रत्येक अनुभव आपल्याला काही तरी शिकवतो. आनंद मिळाला की हसू येतं, दुःख आलं की अश्रू येतात. पण या दोन्ही गोष्टी जीवनाला अर्थ देतात. यामुळेच आपण माणूस म्हणून परिपक्व होतो. निसर्गाच्या सौंदर्यातूनही आयुष्याचं खरं सौंदर्य दिसतं. सकाळची कोवळी किरणं, पक्ष्यांचं कूजबूजण, झाडांची हिरवळ या सगळ्यांनी मन प्रसन्न होतं. आपले कुटुंब, मित्र, शिक्षक, प्रेम, माया  हे सगळं आयुष्याला आणखी सुंदर बनवतं. कधीकधी कठीण प्रसंग येतात, पण तेच आपल्याला मजबूत बनवतात. संकटांवर मात करून जेव्हा आपण यश मिळवतो, तेव्हा आयुष्याचं खऱ्या अर्थाने मोल कळतं.मन मारून जगू नका. कामात स्वतःला व्यस्त ठेवा पण लक्षात ठेवा टेन्शन घेऊ नका. टेन्शन घेऊन अडचणी कमी होत नाहीत तर वाढतात. मन शांत ठेवा आणि अडचणींवर मार्ग काढा. समवयस्क, जुन्या बाल मित्रांशी संपर्कात रहा. आयुष्यात चांगले मित्र फार गरजेचे असतात. जवळच्या मित्रांसोबत घालवलेले चांगले क्षण ताण-तणाव हलके करायला मदत करतात. आयुष्य फक्त काम करण्यासाठी आणि टॅक्स भरण्यासाठी नाही, त्याचा उपभोग घ्या. वर्षातून एकदा तरी नवीन जागी फिरायला जा. मृत्य कधी येईल कोणालाच माहीत नाही. वेळ हातातून वाळूसारखा निसटून चाललाय. जो वेळ शिल्लक आहे त्यात आयुष्य भरभरून जगा.भूतकाळावर पश्चात्ताप आणि भविष्यकाळाची चिंता करण्यापेक्षा वर्तमानकाळात जगा.

शेवटी, आपलं आयुष्य आपणच घडवायचं असतं. सकारात्मक विचार, प्रेम, सहकार्य आणि श्रम यांच्या जोरावर आपण आयुष्य अधिक सुंदर बनवू शकतो. म्हणूनच म्हणावंसं वाटतं – "**आयुष्य खूप सुंदर आहे!**"

# निसर्ग माझा खरा मित्र

कीर्ती नाटेकर
द्वितीय वर्ष मराठी विभाग



आजच्या आधुनिक युगात मानव निसर्गाकडे केवळ एक सामान्य घटक म्हणून पाहतो. कारण निसर्ग आपल्याला सातत्याने काही न काही देतच असतो. जी गोष्ट सहज मिळते, तिची आपल्याला कधीच खरी किंमत कळत नाही. मात्र, जर आपण खोलवर विचार केला, तर लक्षात येईल की निसर्ग हा आपल्या जीवनातील एक खरा आणि निःस्वार्थ मित्र आहे. निसर्ग नेहमीच मूकपणे आपली साथ देत असतो. तो कधीही आपल्यावर कोणतेही बंधन घालत नाही, उलट प्रत्येक क्षणी आपला पाठीराखा म्हणून कार्य करतो. निसर्गाने आपल्याला पाणी, हवा, झाडे, फुले, फळे, पर्वत, नद्या, समुद्रासारख्या अनेक जीवनावश्यक गोष्टी दिल्या आहेत. निसर्गाच्या कुशीत आपले अस्तित्व सुरक्षित आहे आणि त्याने सजीव-निर्जीव सर्वांवर सारखेच प्रेम केले आहे. कवी, लेखक, चित्रकार आणि विविध कलाकारांनी निसर्गाचे सौंदर्य आपल्या सृजनातून जगासमोर मांडले आहे. निसर्गाची सुंदरता ही आपल्यावर अवलंबून आहे. आपण त्याचे संवर्धन करतो की नाश, हे आपल्या कृतींवर ठरते.पावसाळ्यात हिरवीगार सृष्टी, वाहणारे धबधबे, ढगाळ आकाश आणि त्यातून उमटणारे इंद्रधनुष्य हे सारे निसर्गाचे मनोहारी रूप आपल्या डोळ्यांना व मनाला आनंद देतात. पक्ष्यांचे कूजन, सकाळचे स्वच्छ वातावरण, गारवारे हे सर्व निसर्गाचे सौंदर्य अनुभवताना आपण त्याच्या प्रेमात पडतो.

परंतु आज आपण निसर्गाचा अतिरिक्त व अयोग्य वापर करत आहोत. अतिजंगल तोड, प्रदूषण, औद्योगिकीकरण यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. याचा परिणाम म्हणून ग्लोबल वॉर्मिंग, हवामान बदल आणि नैसर्गिक आपत्ती वाढत आहेत. हे सर्व परिणाम शेवटी मानवावरच होणार आहेत, हे आपण विसरत चाललो आहोत. निसर्ग आणि मानव यांचे नाते अतूट आहे. निसर्ग असल्यामुळेच मानवाचे अस्तित्व आहे. हे नाते जपणे, निसर्गाचे रक्षण करणे आणि त्याचे संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. निसर्ग हा केवळ आपला मित्र नाही, तर तो आपल्या जीवनाचा आधार आहे. त्यामुळे निसर्गाशी नातं अधिक दृढ करून, त्याच्याशी सुसंवाद ठेवणे आवश्यक आहे.निसर्ग वाचवा, भविष्य घडवा !

# माझा एलिफंटा लेणीचा प्रवास

संघमित्रा पडवणकर
द्वितीय वर्ष मराठी विभाग

एकदिवस अचानक आमचा एलिफंटाला फिरायला जायचं ठरलं आणि तेही बोटीने जायचं होतं. मी पहिल्यांदाच एलिफंटाला जाणार होती. आणि पहिल्यांदाच बोटीने प्रवास करणार होती. मला खूप आनंद होत होता. कधी एकदाच मी फिरायला जाते असं झालं होतं. आणि तो दिवस आला मी सकाळी लवकर उठली माझी तयारी केली. आम्ही फिरायला जायला निघालो आणि गेट ऑफ इंडियाला गेलो. तिथे जाऊन खूप फोटो काढले. मग आम्ही तिकीट काढले आणि तिकीट दाखवून बोटीत बसलो. बोट गेट ऑफ इंडिया वरून निघाली. त्या समुद्राच्या पाण्याचा खळखळणारा आवाज, आकाश उडणारे पक्षी काही बोटी जात येत होत्या. एक मोठी नवदलाची बोट समुद्रात उभी होती. हे दृश्य मी पहिल्यांदाच पाहिल. हे दृश्य बघून मला खूप आनंद झाला. आमची बोट समुद्राच्या मध्यभागी आली. तेव्हा मी बघितलं समुद्र पूर्ण शांत होता. थोडा पुढे गेल्यावर लांबूनच आम्हाला एलिफंटाचा बेट दिसला. एलिफंटाला आमची बोट आली. तिथे एक ट्रेन होती. ट्रेनमध्ये बसून आम्ही त्या गावात गेलो. त्यागावात सात आठ घर होती. तिथे राहणारे लोक आदिवासी समाजाचे होते. तिथे छोटी छोटी दुकाने होती. तिथे खूप सारी माकड होती. हिरवीगार झाडी होती. नंतर एका आजीच्या हॉटेलमध्ये गेलो. तिथे नाष्टा केला थोडा वेळ आम्ही तिथे बसलो. काही वेळाने आम्ही तिथून निघालो. काही लोकं तोफेच्या दिशेने जात होते. आम्ही सुद्धा तिकडे जायला निघालो. पाचशे पायऱ्या चढून आम्ही तो बघायला गेलो. तोफ ब्रिटिश काळातली आहे. तोफ खूपच मोठी होती. तोफ लोखंड सिसेची होती. तोफेच्या इथून बघितलं तर हे बेट समुद्राच्या मध्यभागी आहे चारही बाजू समुद्र आहे .ते बघितला आणि आम्ही तिथून निघालो. खाली आलो आणि एका दुकानात गेलो. त्या दुकानात लाकडी छोट्या छोट्या बोटी होत्या. त्यातली आम्ही एक बोट घेतली. आम्ही तिथे काही दुकानात गेलो. आम्ही तिथे खूप फिरलो. मग मला तिथे एलिफंटा बद्दल माहिती मिळाली. मुंबई जवळच्या अरबी समुद्रात एलिफंटा बेट आहे. एलिफंटा हे बेट दोन टोकांनी बनले आहे. एलिफंटा लेणी ही घारापुरी लेणी म्हणून ओळखली जाते. तिथे त्या लेणी दगडात कोरल्या गेल्या आहेत. आणि या बेटावर अनेक गुंफा आहेत. एलिफंटा लेणी हे एक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळ आहेत जे पर्यटकांसाठी खूप खास आहे. लांबूनलांबून लोक या पर्यटनाला भेट देतात. संध्याकाळी आम्ही तिथून निघालो. मला हा प्रवास खूप आवडला .प्रवास करण्याने नवीन ऊर्जा मिळते.



# माझा आवडता लेखक चेतन भगत

**गुंजल हरेश पाटील**
प्रथम वर्ष वाणिज्य विभाग




लेखक होण्यासाठी एखाद्याला उत्कृष्ट इंग्रजी बोलता आले पाहिजे असे काही नाही ; हे विधान आधुनिक काळातील लेखक 'चेतन भगत' यांनी चांगले सिद्ध केले आहे. चेतन भगत हे काल्पनिक कथा श्रेणीतील सर्वात लोकप्रिय लेखकांपैकी एक आहेत. कादंबरीकार, स्तंभ लेखक ,पटकथा लेखक, प्रेरक वक्ता म्हणून ओळखले जाणारे चेतन भगत यांच्या कार्याला भारतीय प्रेक्षकांमध्ये प्रचंड लोकप्रियता आणि यश मिळाले आहे. २००८ मध्ये द न्यूयॉर्क टाइम्स ने भगत यांना भारताच्या इतिहासातील सर्वात जास्त विकल्या जाणाऱ्या इंग्रजी भाषेतील कादंबरीकार म्हटले आहे .


चेतन भगत यांचा जन्म २२ एप्रिल १९७४ रोजी दिल्लीत झाला. शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी दिल्ली मधून पदवी प्राप्त केली आणि आयआयएम अहमदाबाद मधून मास्टर्स केले हॉंगकॉंग मध्ये अकरा वर्षे इन्व्हेस्टमेंट बँकर म्हणून काम केल्यानंतर ते मुंबईला परतले आणि पूर्ण वेळ लेखनाला सुरुवात केली. केवळ कामगार असताना त्याने आयआयटीच्या कॅम्पसमध्ये जीवनाबद्दलची कादंबरी सुरु केली होती. खूप संघर्षानंतर त्यांची पहिली कादंबरी फाईव्ह पॉईंट समवन २००८ मध्ये आली आणि या पहिल्याच पुस्तकाने त्यांची प्रसिद्धी प्रचंड वाढली. हे पुस्तक त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीतील सर्वात महत्त्वाचे पुस्तक आहे .आजपर्यंत भारतातील सर्वाधिक विकले जाणारे पुस्तक आहे. भगत यांनी आतापर्यंत ७ पुस्तके लिहिली आहेत. फाईव्ह पॉईंट समवन, वन नाईट ॲंड द कॉल सेंटर, द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईव्ह, टू स्टेट्स , क्रांती २०२० हॉट यंग इंडिया आणि हाफ गर्लफ्रेंड कादंबऱ्या लिहिण्या व्यतिरिक्त भगत टाइम्स ऑफ इंडिया आणि दैनिक भास्कर यासाठी लेखसुद्धा लिहितात.

चेतन भगत यांनी कॉमेडीवर आधारित कादंबरी साध्या इंग्रजीत लिहून सुरुवात केली होती २०१० मध्ये, टाइम मासिकाने त्यांना 'जगातील १०० सर्वात प्रभावशाली लोकांपैकी एक' म्हणून नाव दिले. पुस्तकांचा किडा समजल्या जाणाऱ्या प्रतिभावान आयआयटी अभियंत्यांची व्याख्या त्यांनी पूर्णपणे बदलली आहे. अनेक अभियंते स्वतः त्यांच्यासारखेच लेखनाकडे वळले आहेत.

# मराठी संतांचे सामाजिक कार्य


## मृणाली सुनील सर्वेकर


द्वितीय वर्ष वाणिज्य विभाग


सामाजिक दृष्टीने संतकार्याची परीक्षण करण्याचे अनेक प्रयत्न आजवर विचारवंतांनी केलेले आहेत. महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, न र फाटक, वि. का. राजवाडे, गं. बा. सरदार, रा.चिं. ढेरे, वि.भि. कोलते, प्रा. सदानंद मोरे यांच्यासारख्या अनेक व्यासंगी विद्वानांनी या बाबत आपली अभ्यासपूर्ण मते मांडली आहेत. यातीत काही विचारवंतांनी, संताचे कार्य हे मुलभूत, पायाभूत आणि राजकीय चळवळीला प्रेरणा, प्रोत्साहन देणारे आहे. किंबहुना संत विचारांमुळेच समाजाचे वैचारिक उद्बोधन झाले. देव, देश, धर्म याबद्दल आस्था, आदर, प्रेम निर्माण झाले आणि यामुळेच सामान्य माणूस सुद्धा बलिदान करायला तयार झाला त्यांच्या या वृत्तीतूनच पुढची चळवळ उभी राहिली. असा निष्कर्ष काढला.याच्या अगदी उलट काही विचारवंतांना संताचा मार्ग हा निष्क्रियतेचा, नेभळटपणाचा वाटला. संत भौतिक, सामाजिक, राजकीय प्रगती विषयी उदासीन होते. त्यांचे संपूर्ण जीवन हे आध्यात्मिक, पारलौकिक प्रगतीकडे होते. त्यांनी समाजाला दुबळे बनविले, निवृत्तीपर बनवले. समाज प्रतिकारशक्ती हरवून बसता, पारतंत्र्याचे त्याला काही वाटेनासे झाले अशी मते मांडली गेली. याच्याही पुढे जावून असे सांगितले गेले की विषमता मूलक, वर्णवर्चस्ववादी धर्म समाजाच्या माथी मारण्याच डावपेचांचा एक भाग म्हणून धूर्ततेने व लबाडीने काही संतांनी आपल्या वाङ्मयीन रचना समाजाच्या गळी उतरवल्या,ही इतकी परस्पर विरोधी मते वाचल्यावर सामान्य जणांचा गोंधळ उडणे स्वाभाविक आहे. विचार साधकांच्या व सामान्य माणसांच्या मनातील हा गोंधळ दूर होऊन त्याला योग्य निष्कर्ष काढण्यास मदत व्हावी या हेतूने हा लेख लिहिला आहे. संत चळवळीचा कळस असलेल्या तुकाराम महाराजांच्या साहित्याचा अनुषंगाने केलेला विचार म्हणून गाथेतील अभंगाचे दाखले देऊन मत मांडणी केली आहे. खरंतर सर्व संतांचे विचार सारखेच आहेत फक्त सांगण्याची पद्धत, तीव्रता आणि व्याप्ती वेगवेगळी आहे .

या सर्व विचारांचा अभ्यास करत असताना काही मूलभूत प्रश्न मनात उभे राहिले . जर संत सामाजिक राजकीय बाबतीत इतके उदासीन असते तर मग 'बुडते हे जण देखणे डोळा ! म्हणून कळवळा संतांच्या जगती ! ' हे कसे ? लोक भक्ती विसरले होते. या अशा बुडत्यांना समजावून सांगून परत भक्तीकडे अध्यात्मिकतेकडे वळविणे इतकेच संतांना हवे होते काय? सर्व लोकांनी भौतिक विचार सोडून देऊन, ऐहिक कर्मे कर्तव्ये त्याचा त्याग करून देव देव करत जगावे अशी संतांची अपेक्षा होती काय ? बहुतांशी संसारात रमणारा सामान्य माणूस सर्व आशा अपेक्षा सोडून भौतिक राजकीय आकांक्षांचा त्याग करून वनमार्गी व्हावा असे करण्यातच त्यांची प्रगती आहे असा त्यांचा आग्रह होता काय? संत विचार कालबाह्य झालेले नसून उत्कट आजच्या युगातील विषमता,जातीवाद, दहशतवाद ,फुटीरतावाद , इत्यादी वाद मिटवण्यासाठी त्यांची प्रामुख्याने गरज आहे असे मला वाटते हा लेख वाचून वाचकांना ते पटेल तर ते मी माझे भाग्य समजेल.

# मानसा मानसा कधी व्हशील मानुस...



प्रा. नेहा संदीप भोसले
श्री. एम. पी शाह कनिष्ठ महिला महाविद्यालय

कधीही न सुटणारे अजब कोडे म्हणजे स्त्री विधात्याची सर्वात सुंदर निर्मिती म्हणजे स्त्री मान्य आहे असते हळवी ती पण तरीही प्रत्येक परिस्थितीत खंबीर असते ती; खरोखरच हे वर्णन योग्यच आहे परमेश्वराची सुंदर अशी ही निर्मिती म्हणजे पिढ्यान पिढ्या निर्माण करणारी.विठोबाचे अन् रामाचे मंदिर याच माझ्या शाळा असे म्हणणाऱ्या बहिणाबाई चौधरी यांनी कधी शाळेचे तोंडपाहिले नव्हते आणि त्यांना लिहिता वाचता येत नव्हते. जणू काय त्यांच्या मुखातून सरस्वतीच बोलत होती.सुप्रसिद्ध सोपानदेव चौधरी यांच्या मातोश्री, जुन्यात चमकेल आणि नव्यात झळकेल, असे त्यांच्या काव्यसुमनांचे तेज; असे केशव कुमार यांनी त्यांच्या काव्याचे केलेले कौतुक. प्र. के. अत्रे यांनी त्यांच्या काव्याची ओळखसंपूर्ण महाराष्ट्राला करून दिली. त्यानंतरच संपूर्ण महाराष्ट्रातील रसिक जनता त्यांना 'निसर्गकन्या बहिणाबाई' म्हणून ओळखू लागली.

बहिणाबाईच्या खान्देशी बोलीभाषेतील प्रत्येक कविता तुमच्या-आमच्या सारख्या सामान्य माणसाला जीवनाचे सार सांगून जातात. बहिणाबाईंनी आपल्या कवितांचे गुपित सांगताना; 'माझी माय सरसो ती, माले शिकवते बोली' या काव्यपंक्तीतून सरस्वतीला श्रेय दिले आहे. त्यांच्या 'माहेर, माहेरची वाट'; या कवितांमधून स्त्रियांना आपल्या माहेरचा ओढा हा कायमच असतो पण स्त्री दोन घरांना जोडते. सासर माहेर जोडताना त्यांनी माहेरच्या ओलाव्याचे कौतुक केले आहेच, पण सासरच्यांचे कौतुक करायला त्या विसरल्या नाहीत. सासुरवाशीन म्हणून तिच्या सर्व जबाबदाऱ्या तिला पूर्ण करायच्या आहेत हे त्यांनी 'सासुरवाशीन' कवितेत व्यक्त केल्या आहेत. सासर माहेर यांना जोडणारा दुवा महणजे 'स्त्री' आहे. हा जीवनाचा दृष्टिकोन मांडताना त्यांनी 'संसार' या कवितेमध्ये संसाराची दोन चाके एक पती दुसरे पत्नी.संसार म्हणजे दोन जीवांचा विचार आहे. हे स्पष्ट करताना त्यांनी सहज सोप्या उदाहरणातून मोठे तत्त्वज्ञान सांगितले आहे.'लपे करमाची रेखा' या कवितेतून बहिणाबाईनी आयुष्याचा जोडीदार नसेल तर सर्व दुःखी बाजूला ठेवून स्त्रीने कणखर व्हायला हवे हे सांगताना त्यांच्यावर जीवनातील संसाराचा गाडा दुःख बाजूला सारून पुढे नेला.बहिणाबाई शेतकरी असल्यामुळे त्यांची सकाळ ही जात्याच्या ओव्या म्हणताना होत असे आणि त्याच वेळेस त्यांच्या काव्याला उधाण येत. असे छोट्या छोट्या रोजच्या कामात रमताना त्यांनी शेतीच्या अवजारांवर पशुपक्ष्यांवर, शेतीच्या सर्व कामांवर काव्य लिहिले आहे. यातून त्यांचा जीवनाकडे बघण्याचा साधा, सोपा आणि सहज दृष्टिकोन दिसून येतो. यात माणूस सुद्धा त्यांच्या नजरेतून सुटला नाही 'मानुस' या कवितेतून तर माणसाला माणूसपणा तू कसा विसरलास हे विचारताना त्या म्हणतात,

मानसा मानसा कधी व्हशील मानुस,

लोभासाठी झाला मानसाचा रे कानूस

बहिणाबाईनी कवितांबरोबरच सुभाषितांचा आपल्या काव्यात उपयोग केला आहे. त्यातूनसुद्धा त्यांनी 'कशाला काय म्हणू नवे' या काव्यातून भाषेबरोबरच विचारांची जी वांड्मयाला दिलेली देण आहे ती अमूल्य आहे.बहिणाबाईनी साध्या सोप्या शब्दातून समाजाला मोठे तत्त्वज्ञान सांगितले आहे जीवनात जगण्यातील आनंदाचे मोल त्यांनी छोट्या छोट्या व्यवहारातील प्रतिकांमधून व्यक्त केले आहे हे तत्त्वज्ञान म्हणजे मराठी वाङ्मयातील मैलाचा दगड आहे.

अशा या बहिणाईंना माझा शतशः प्रणाम..!

# चारोळ्या

**प्रा. सतीश पवार**
श्री. एम. पी शाह कनिष्ठ महिला महाविद्यालय

हिरवा निळा भगवा करता करता
'तिरंगा' विसरला जातोय
जात-धर्म मरत नाही दंगलीत
फक्त 'माणूस' मारला जातोय

तुझ्या प्रेमाच्या पुस्तकातील
माझ्या प्रेमाची एकतरी ओळ पूर्ण होऊ दे
कैक वेळा स्वल्पविराम,अर्धविराम आले
आता तरी पूर्णविराम येऊ दे.

मी जिवंत असताना
माझ्यावर रुसणाऱ्यांना मी पाहिले,
मी गेल्यावर प्रमोशन लवकर होणार,
या खुशीत हसताना त्यांना मी पहिले

युती 'महा' करण्यासाठी
छोटे पक्ष शोधू लागले
निवडणूक जवळ आली की
लिंबू टिंबूचे महत्व त्यांना कळू लागले.



# मला पडलेलं स्वप्न

**पायल रामुंगडे**
प्रथम वर्ष वाणिज्य विभाग

स्वप्न ही मानवाच्या मनाची एक सुंदर, अद्भुत देणगी आहे. प्रत्येकालाच स्वप्न पडतात कधी गोड, कधी भितीदायक, तर कधी प्रेरणादायक. अशीच एक रात्र होती, जेव्हा मला एक विलक्षण आणि माझं आयुष्यच बदलून टाकणारं स्वप्न पडलं.त्या रात्री मी अभ्यास करून थकून झोपले होते. डोळे मिटल्या बरोबर मी एका अनोख्या जागी पोहोचले. आजूबाजूला सुंदर हिरवी झाडं, फुलांनी भरलेली मखमली शेते, निळशार आकाश आणि गाणाऱ्या पक्ष्यांचा मधुर आवाज. असं वाटत होतं की मी एका स्वर्गसदृश ठिकाणी आले आहे. चालता चालता मी एका झऱ्याजवळ पोहोचले. झऱ्याचं पाणी इतकं स्वच्छ होतं की त्यात माझं प्रतिबिंब अगदी स्पष्ट दिसत होतं.अचानक त्या झऱ्याजवळ एक तेजस्वी प्रकाश दिसला आणि त्यातून एक दिव्य स्त्री प्रकट झाली. तिच्या अंगावर शुभ्र वस्त्रं होती आणि चेहऱ्यावर प्रसन्न हसू. तिनं मला प्रेमळ आवाजात विचारलं, "बाळा, तुला आयुष्यात काय व्हायचं आहे ?" मी थोडीशी घाबरले, पण लगेच म्हणाले, "मला मोठी वैज्ञानिक व्हायचं आहे. माझ्या देशासाठी काही तरी नवीन शोध लावायचा आहे."ती दिव्य स्त्री मंद हसली आणि म्हणाली,"हे फार चांगलं स्वप्न आहे. पण हे प्रत्यक्षात आणण्यासाठी तुला मेहनत, संयम आणि चिकाटी लागेल." तिचे शब्द माझ्या मनात खोलवर रुजले.तेवढ्यात आकाशात वीज चमकली, जोरदार आवाज झाला आणि माझी झोप मोडली. मी दचकून जागी झाले. पण माझं मन अजूनही त्या सुंदर स्वप्नात अडकलं होतं.त्या दिवसानंतर मी स्वतःमध्ये खूप बदल घडवून आणले. मी अभ्यासात लक्ष देऊ लागले. वेळ वाया घालवणं थांबवलं. आई-वडिलांचं ऐकू लागले. स्वप्न फक्त पाहायची नसतात, तर ती सत्यात उतरवण्यासाठी प्रयत्न करायचे असतात, हे मला उमगलं.

माझ्यासाठी ते स्वप्न केवळ झोपेत पाहिलेला एक क्षण नव्हता, तर ते एक प्रेरणा बनून आलं. जेव्हा जेव्हा मी थकते, गोंधळते , तेव्हा तेच स्वप्न मला आठवतं आणि नवी उमेद देतं. स्वप्न पाहणं हे महत्त्वाचं आहे, पण ते साकार करण्यासाठी झपाटून मेहनत करणं हे त्याहून अधिक महत्त्वाचं आहे.त्यामुळे प्रत्येक मुलीने आपलं स्वप्न ठरवावं, त्यावर विश्वास ठेवावा आणि संधी मिळवण्यासाठी खंबीरपणे पुढे जावं हिच त्या स्वप्नाची खरी शिकवण आहे.




# स्त्रियांचे आत्मचरित्रपर लेखन

## तन्वी राजेश ठाकूर

तृतीय वर्ष मराठी विभाग

मराठीतील स्त्रियांचे आत्मचरित्रपर लेखन अल्पशा आहे. पण मराठीतील जी काही चांगली आत्मचरित्रे आहेत. ती सगळी स्त्रियांनी लिहिलेली आहेत. आत्मचरित्राला आजचा घाट लाभण्यापूर्वी आठवणी आख्यायिका, आत्मनिवेदन, रोजनिशी इत्यादी लेखन केले जात असे. सर्व आत्मचरित्रे कलात्मक हेतूने लिहिली जातात असे नाही. काहींना आपण जीवन जसे घालविले ते सलगपणे सांगावेसे वाटते. तर काहींना वाटते की आपले जीवन इतरांना दीपस्तंभासारखे मार्गदर्शक होईल. तर वीर सावरकरांसारख्या देशभक्तांना वाटते, की माझ्या आठवणी केवळ एखाद्याचे चरित्र नसून उभ्या पिढीचे जीवन त्यात प्रतीत होईल. एखादी व्यक्ती आत्मचरित्र लिहिण्याच्या हेतूने महाराष्ट्रात ज्या ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक वाङ्मयीन घटना घडल्या त्याची सविस्तर माहिती सांगत राहाते. आत्मचरित्र हा आल्पशोध असतो. 'स्व'रूपाकडे ज्याला तटस्थपणे पाहता येते तो आत्मचरित्र चांगले लिहू शकतो, आत्मगौरव, आत्मसमर्थन, आत्मटीका, आत्मनिर्भर्त्सना इत्यादींचे प्रमाण अवाजवी असले की ते लेखन कलात्मक पातळीवर जाऊ शकत नाही. जे आपण भोगले ते प्रांजळपणे, मोकळेपणाने कथन करता आले पाहिजे. ज्याच्याजवळ सांगण्यासारखे काही आहे त्याचेच कथन वाचनीय वाटेल. आत्मचरित्र म्हणजे काही समग्र इतिहास नव्हे. बालपणापासून अखेरपर्यंत सगळे सांगितलेच पाहिजे असे नाही. वस्तुतः आपल्या आयुष्याच्या कोणत्या भागापासून आत्मवृत्ताला सुरुवात करावी आणि ते कोठे संपवावे या बाबतीत आत्मचरित्रकाराला स्वातंत्र्य आहे.

अथपासून सर्व घटना सांगत गेल्यामुळे त्याला आढाव्याचे स्वरूप प्राप्त होईल. शिवाय स्मरणशक्तीला मर्यादा आहेत. तसेच जे-जे आठवेल ते-ते लिहीत राहिले तर लेखन विस्कळीत होईल, आत्मचरित्रातून आपल्याला जाणवायला हवे ते 'मी' चे बहुरंगी व्यक्तिमत्त्व, त्याने घेतलेला अर्थपूर्ण जीवनानुभव. मराठीत जी आत्मचरित्रे लिहिली गेली त्यातील चांगली आत्मचरित्रे स्त्रियांनीच अधिक लिहिली आहेत. तशी एका अर्थाने ती पती-चरित्रेच आहेत. पेशवेकाळातील आनंदीबाईची दिनचर्या हे आत्मकथनपर लेखन वगळले तर अव्वल इंग्रजी कालखंडात एकाही स्त्रीने आत्मचरित्र लिहिले नाही. पहिले आत्मचरित्र लेखन म्हणजे रमाबाई रानडे यांनी लिहिलेल्या 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' (१९१०), न्या. रानडे १९०१ साली मृत्यू पावले आणि नंतर काही वर्षांनी रमाबाईनी आपल्या सहजीवनाचा पट आठवणींच्या धाग्यांनी विणला. लक्ष्मीबाई टिळकांची 'स्मृतिचित्रे' म्हणजे पुन्हा आपल्या पतीच्या जीवनाच्या कहाणीचे अतिशय सुंदर निवेदन इतके कलात्मक आत्मचरित्र मराठीत तरी दुर्मीळ आहे. रेव्हरंड टिळकाची जीवितकथा सांगताना तीत गुंफलेली लक्ष्मीबाईची जीवनकथा सहज उलगडली जाते. आत्मचरित्रात 'मी' ला स्वरूपाकडे अलिप्तपणे पाहता आले. गोपाळ गणेश आगरकर चरित्र या पुस्तकात यशोदाबाई आगरकर यांनी आगरकरांच्या आठवणी सांगितल्या, त्यांचे शब्दांकन दत्त नारायण आपटे यांनी केले आहे. या आठवणीतून आगरकरांचे खाजगी जीवन प्रथमच आपल्यासमोर येते. श्रीमती पार्वतीबाई आठवले यांनी लिहिलेले 'माझी कहाणी' (१९२८) हे आत्मनिवेदन म्हणजे अनाथ बालिकाश्रमाच्या परिचारिका म्हणून केलेल्या कामाची हकिकत आहे. ही कहाणी वाचत असताना पार्वतीबाईच्या कर्तृत्वाचा आलेख स्पष्ट समोर उभा राहतो. महिना पंधरा रुपयांची नोकरी असलेल्या अधू पायाच्या नवऱ्याबरोबर वयाची वीस वर्षे होई तो संसार केला व नंतर वैधव्य दशेत आयुष्य कंठले. आपल्या जीवनाला व विचाराला अण्णासाहेब कर्व्यांनी वळण लावले याबद्दल त्यांचे मन कृतज्ञ आहे.



केशवपनाच्या चालीविरुद्ध असलेल्या पार्वतीबाईंनी मुंडणस्थितीत वीस वर्षे घालविली, वयाच्या चाळिसाव्या वर्षी इंग्रजी मुळीच येत नसताना अमेरिकेस जाऊन तेथे मोलकरणीची कामे करून तेथेच इंग्रजी शिकून त्या ध्येयवादी व महत्वाकांक्षी स्त्रीने महर्षी कर्वे यांच्या संस्थेसाठी पैसा आणला. आनंदीबाई कर्वे याचे 'माझे पुराण' (१९४४) हे आत्मचरित्र बायांच्या निःसंकोचपणाने आणि प्रांजलपणाने केलेल्या निवेदनामुळे चित्त वेधून घेते, अण्णासाहेब कर्वे याचे कर्तृत्व मोठे होते, स्त्रियांसाठी त्यांनी केलेल्या अविश्रांत समाजकार्यामुळे मराठी माणसाच्या मनात अण्णासाहेबांना मानाचे स्थान मिळाले होते. आपल्या नवऱ्याच्या थोरपणाची, त्याच्या कर्तृत्वाची तिला ेजाणीव होती आणि आपण एका श्रेष्ठ पुरुषाची पत्नी आहोत, याचा अहंकारही होता. महर्षी कर्वे याच्या स्त्रीशिक्षण कार्याचे फळ म्हणजे स्त्रीला आपली सुख-दुःखे मोकळेपणाने सांगण्याचे धैर्य होऊ लागले. विद्या माणसाला मुक्त करते असे म्हणतात तसे इंग्रजी विद्येच्या स्पर्शाने स्त्रीला आपले मन मोकळे करता आले. तिच्या मनात नवा विचार रुजविण्याचे कार्य फुले-आगरकर-कर्वे-शिंदे इत्यादी समाजसुधारकांनी केले. लीलाबाई पटवर्धन यांच्या 'आमची अकरा वर्षे' (१९४७) या आत्मकथनाचे स्वरूप निराळे आहे. रमाबाई किवा लक्ष्मीबाई यांच्याप्रमाणे लीलाबाईनी माधवरावांच्या बरोबर जो अकरा वर्षे संसार केला. त्याची कहाणी सांगावयाची आहे. १९५० नंतर मराठीतील आत्मचरित्र लेखनाला नवी दिशा मिळाली. सामाजिक संकोच बराचसा दूर झाला आहे. आपले खाजगी जीवन चारचौघात स्पष्टपणे मांडले तर कुणाला फारसे बोचत नाही. उलट कादंबरीपेक्षा मोकळेपणाने लिहिलेली आत्मचरित्रे अधिक लोकप्रिय दिसतात.

माणूस मोठा असो की सामान्य असो, आपल्याजवळ सांगण्यासारखे आहे म्हणूनच तो आत्मकथन करायला प्रवृत्त होतो. आपले आयुष्य अर्थपूर्ण आहे असे एखाद्याला वाटणे साहजिक आहे. या कालखंडात स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्राचा घाट केवळ सहजीवनाची कथा असा राहिला नाही. वेगवेगळ्या स्तरांतून स्त्रिया समाजसेवा करीत आहेत; तर कुणी एखाद्या कलेलाच वाहून घेतले आहे. चित्रपट, नाटक, नृत्य इत्यादीची कलाक्षेत्रात स्त्रीला कलावंत म्हणून जगावे लागते. त्यातले अनुभव कौटुंबिक अनुभवांपेक्षा वेगळे असणार. एखादी स्त्री समाजसेवेचे एखादे क्षेत्र निवडते व त्यात स्वतःला झोकून देते. हे अनुभव कसे चाकोरीबद्ध असतील ? याच अर्थ एवढाच की, वेगवेगळे अनुभव मांडण्यासाठी स्त्रिया वेगवेगळ्या रीतींचा अवलंब करीत आहेत. नृत्यकलेचा अभ्यास करणाऱ्या रोहिणी भाटे यानी 'माझी नृत्यसाधना' (१९७०) या आत्मकथनात या कलेसाठी कशी तपश्चर्या केली ते सांगितले आहे. बॅ. जयकरांना दिलेल्या पत्रात त्या लिहितात,नृत्यकलेची उपासना, जोपासना किंवा साधना हे माझे ध्येय आहे. त्या ध्येयाची काटेरी वाट चालताना आलेले शुभाशुभ प्रसंग आणि अनुभव मला मार्गदर्शकच ठरले आहेत. 'द्रौपदीची थाळी' हे गिरजाबाई केळकरांचे आत्मचरित्र (१९५९) म्हणजे आनंदात राहून आपल्या परिसरातील सर्वांना आनंदित ठेवायची कला ज्यांना साधली आहे अशा गिरजाबाईचे कृतार्थ चरित्र . हे चरित्र लिहिले तेव्हा गिरजाबाईची मनःस्थिती वेगळी होती.

१९७० साल हे तसे आत्मचरित्र लेखनाच्या बहराचे साल म्हणून म्हणता येईल. तसेच आत्मचरित्राच्या विकासाला एक नवी दिशा मिळाली ती याच वर्षात. आजवरच्या स्त्रियानी लिहिलेल्या आत्मचरित्रात 'पती' हे चिंतनाचे मुख्य केंद्र होते; पण हंसा वाडकर लिखित 'सांगत्ये ऐका' व गोदावरी परुळेकर लिखित 'जेव्हा माणूस जागा होतो' या दोन आत्मचरित्रांनी 'स्व'चा शोध घेतला. आत्मचरित्र' या वाङ्मयप्रकाराला संपन्न करण्याचे श्रेय स्त्रियांच्या आत्मचरित्रानाच आहे. 'स्मृतिचित्रे', 'मी'च हे सांगितले पाहिजे, 'सांगत्ये ऐका', 'सांजवात', 'जेव्हा माणूस जागा होतो' ही आत्मचरित्रे म्हणजे मराठी साहित्याची लेणी आहेत. स्त्रियांच्या आत्मचरित्रांना 'पतिचरित्र' असे संबोधले जाते; पण खरे म्हटले तर ते सहजीवनाचे चित्र असते. ज्या स्त्रिया आपल्या पतीच्या जीवनात पार गुंतून गेल्या आहेत त्या जेव्हा आपल्या पतीच्या व्यक्तिमत्वाचे व त्याच्या कर्तृत्वाचे तटस्थपणे मूल्यमापन करीत असतात तेव्हा त्यातून त्याच्या व्यक्तिमत्वाचेही दर्शन घडते. स्त्रियांनी लिहिलेली आत्मचरित्रे प्राधान्याने आठवणीची माळ गुंफणारी आणि या आठवणींतून सहजीवनाचे चित्रण करणारी आहेत. रमाबाई-माधवराव, लक्ष्मीबाई-टिळक,माधवराव-लीलाबाई, केतकर-शीलावतीबाई इत्यादी भावसंबंध या आत्मकथनांतून गोचर होतात तेव्हा त्यातून मराठी समाजातील स्त्री-पुरुष नात्याचे दर्शन घडते. स्त्री-पुरुषाचे नाते स्वामी-वास असे नाही तर ते मैत्रीचे आहे. जिथे हे नाते आहे तिथे या लेखनाला रम्यता आली आहे.जिथे स्त्रीने आपले क्षेत्र निवडले, त्या क्षेत्रातील अनुभव अलिप्तपणे सांगता आले ते आत्मचरित्र रसपूर्ण झाले आहे. हंसा वाडकर आपल्या वाट्याला आलेले भीषण अनुभव जेव्हा कथन करतात तेव्हा आपण अंतर्मुख होतो आणि आपल्या मनात प्रश्न उभा राहतो की, स्त्रीला नुसते शरीर आहे का? तिला माणूस म्हणून समाजात तिची हक्काची जागा मिळालीच पाहिजे. गोदूताईनी ध्येयनिष्ठेपायी घराच्या चार भिंती ओलांडल्या व पशुपातळीवर जगणाऱ्या आदिवासींच्या मनात क्रांतीची बीजे पेरली. हा सगळा रोमहर्षक इतिहास जिवंत उभा राहतो तो स्त्रीदेखील बदलत्या काळाचे आव्हान स्वीकारते म्हणूनच.

१९७० साली हे तसे आत्मचरित्र लेखनाच्या बहराचे साल म्हणून म्हणता येईल. तसेच आत्मचरित्राच्या विकासाला एक नवी दिशा मिळाली ती याच वर्षात आजवरच्या स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रात 'पती' हे चिंतनाचे मुख्य केंद्र होते; पण हंसा वाडकर लिखित 'सांगत्ये ऐका' व गोदावरी परुळेकर लिखित 'जेव्हा माणूस जागा होतो' या दोन आत्मचरित्रांनी 'स्व'चा शोध घेतला. आत्मचरित्र' या वाङ्मयप्रकाराला संपन्न करण्याचे श्रेय स्त्रियांच्या आत्मचरित्रानाच आहे. 'स्मृतिचित्रे', 'मी'च हे सांगितले पाहिजे, 'सांगत्ये ऐका', 'सांजवात', 'जेव्हा माणूस जागा होतो' ही आत्मचरित्रे म्हणजे मराठी साहित्याची लेणी आहेत. स्त्रियांच्या आत्मचरित्रांना 'पतिचरित्र' असे संबोधले जाते; पण खरे म्हटले तर ते सहजीवनाचे चित्र असते. ज्या स्त्रिया आपल्या पतीच्या जीवनात पार गुंतून गेल्या आहेत त्या जेव्हा आपल्या पतीच्या व्यक्तिमत्त्वाचे व त्याच्या कर्तृत्वाचे तटस्थपणे मूल्यमापन करीत असतात तेव्हा त्यातून त्याच्या व्यक्तिमत्वाचेही दर्शन घडते. स्त्रियांनी लिहिलेली आत्मचरित्रे प्राधान्याने आठवणीची माळ गुंफणारी आणि या आठवणींतून सहजीवनाचे चित्रण करणारी आहेत. रमाबाई माधवराव, लक्ष्मीबाई टिळक, माधवराव-लीलाबाई, केतकर शीलवतीबाई इत्यादी भावसंबंध या आत्मकथनांतून गोचर होतात तेव्हा त्यातून मराठी समाजातील स्त्री-पुरुष नात्याचे दर्शन घडते. स्त्री-पुरुषाचे नाते स्वामी-वास असे नाही तर ते मैत्रीचे आहे. जिथे हे नाते आहे तिथे या लेखनाला रम्यता आली आहे.

जिथे स्त्रीने आपले क्षेत्र निवडले, त्या क्षेत्रातील अनुभव अलिप्तपणे सांगता आले ते आत्मचरित्र रसपूर्ण झाले आहे. हंसा वाडकर आपल्या वाट्याला आलेले भीषण अनुभव जेव्हा कथन करतात तेव्हा आपण अंतर्मुख होतो आणि आपल्या मनात प्रश्न उभा राहतो की, स्त्रीला नुसते शरीर आहे का? तिला माणूस म्हणून समाजात तिची हक्काची जागा मिळालीच पाहिजे. गोदूताईनी ध्येयनिष्ठेपायी घराच्या चार भिंती ओलांडल्या व पशुपातळीवर जगणाऱ्या आदिवासींच्या मनात क्रांतीची बीजे पेरली. हा सगळा रोमहर्षक इतिहास जिवंत उभा राहतो तो स्त्रीदेखील बदलत्या काळाचे आव्हान स्वीकारते म्हणूनच.

# जगणे

भूमी लोखंडे
द्वितीय वर्ष समाजशास्त्र विभाग

जगून जगून जगणार किती
प्रत्येकाला इथे मरण्याची भीती
चालून चालून चालणार किती
प्रत्येकाला इथे दमण्याची भीती


प्रत्येक जण झगडतोय जगण्यासाठी
कोणी घेतली हातात तलवार तर
कोणी होतोय कवी ;
कोणी बोलतो निर्भयपणे समोर
तर कोणी चुगली करतो गुपचूप पाठी

जगून जगून जगणार किती
प्रत्येकाला इथे मरण्याची भीती
धावतोय प्रत्येक जण इथे
दुसऱ्याला हरवण्यासाठी...



# ओळख

**तन्वी देवळे**
तृतीय वर्ष, अर्थशास्त्र विभाग




ओळख माझी मी सांगू कशी
काळाने केला अत्याचार पण ठरली मीच दोषी
सांगा ओळख माझी मी सांगू कशी
नाकात नथ गळ्यात ठुशी पण त्याच गळयात
आयुष्याने घातली बलात्काराची फाशी ।।
नऊवारी साडी डोक्यावर पदर
स्त्रीदाक्षिण्य मानणारे हाच का तो आदर
वाचतो आपण ग्रंथ आणि लिहितो आपण कथा
माझ्यावर केलेल्या कृत्याची मांडू कशी व्यथा
संसार संभाळता संभाळता चढली पायरी शिक्षणाची
पैसे नको प्रसिद्धी नको गरज फक्त संरक्षणाची
आई मीच, मीच ताई आणि मावशी
मग जन्मल्यावर मीच का होते नकोशी ।।
खूप झाली सेवा आणि खूप झाले कर्म
ईश्वरचरणी हीच प्रार्थना पुन्हा का घ्यावा बाईचा जन्म

# राजा शिवछत्रपती

## गीतांजली पोळ

द्वितीय वर्ष मराठी विभाग

उगवला दिवस सोन्याचा
जन्मला पुत्र सह्याद्रीचा
नाव त्याचे होते शिवाजी
प्रत्येक वेळी खेळला होता जीवाशी
कोण होता शिवाजी
काय वरना वी त्याची महती
नाही दिसत गाजे
त्याच्या पराक्रमाची कीर्ती
तो तळपत्या सूर्याचे तेज होता
दाटलेल्या अंधाराचा लखलखता प्रकाश होता
निढळया छातीचा धारदार तलवारीचा
निष्ठा त्याची अफाट
करी शत्रूला भुई सपाट
घेतली शपथ स्वराज्याची
राखली जाणं कर्तव्याची
तो शत्रूचा कर्दन काळ होता
रयतेचा वाली होता
म्हणूनच दर्जा छत्रपतींचा होता
दिलाच छावा ऐसा स्वराज्यास
नाव त्याचे शंभू महाराज
नाही केली परवा जीवाची
मिटली काळजी स्वराज्याची
सोसाट्याचा वारा सुटला
स्वराज्याचा सूर्य मावळला
काळाने घाला घातला
माझ्या राजाचा श्वास तिथेच थांबला
शिवराय प्रणाम तुमच्या कार्याला
माझा त्रिवार मानाचा मुजरा तुमच्या शौर्याला



# सोनेरी पानं

## दुर्गा जोगदंड
तृतीय वर्ष मराठी विभाग



मराठी विभागाचं ते छोटंसं पण प्रेमळ दालन,
शब्दांनी भरलेलं, विचारांनी भारलेलं गोकुळाचं सारं आलम ।
गुरूजींचा गंभीर चेहरा, पण शब्दात माया लपलेली,
आणि मित्रमैत्रिणींची, कविता, कथा, चर्चांनी रंगलेली ।

ग्रंथालयातली ती शांतता,
आणि त्यात हरवलेली ज्ञानाची खंतता,
शब्दांच्या दुनियेत हरवायचं,
आणि एखादं जुजबी पुस्तक सापडल्यावर हसून रमायचं ।

'तुकाराम', 'फडके', 'तात्यासाहेब'
अशा असंख्य पुस्तकांत, जणू वेळही थांबत,
पानांमधली ती सुगंधित गुंतवणूक,
जी ज्ञानासोबत दिली मनाला उधाणाची झुळूक ।

आणि मग ती विभागाची सहल –
जिथे मजा होती, पण ज्ञानही होतं समांतर,
किल्ल्यांवरून इतिहास उलगडायचा,
आणि कवितांमध्ये स्वतःलाच पुन्हा गाठायचं ।

साहित्य संमेलन, नाट्यस्पर्धा, मराठी भाषा दिन
प्रत्येक कार्यक्रमात होती आमचीच गर्दी भराभरा,
कधी अभिनय, कधी भाषण, कधी वादविवाद –
आम्ही सगळेच होतो शब्दांचे उस्ताद ।

त्या प्रत्येक क्षणात होतं काहीतरी खास,
नात्यांची वीण आणि आठवणींचा सुवर्णवास।
आजही डोळे मिटले, की दिसतो तो विभाग –
जिथे मराठी फक्त विषय नव्हता,
तर होता आमचा आत्मभाव ।

# शेवटचं वर्ष

हिना कादिर
तृतीय वर्ष मराठी विभाग


तीन वर्ष कधी गेली कळलंच नाही,
नवीन ओळखी आज जीवाश्च झाल्या कंठी।
पहिलं वर्ष धडपडत, पुस्तकात डोकं घालून,
आता शेवटचं वर्ष – आणि मन मात्र मागं वळून।
क्लासेसपेक्षा कट्ट्यावर गप्पा भारी,
लेक्चरमध्ये झोप आणि नोट्सची उधारी।
प्रॅक्टिकल्सचं नाव काढलं की जीव घाबरतो,
पण व्हायवा त काहीतरी सांगायचं असं ठरवतो।
ती कॅन्टीनची चहाची कपं,
अन मैत्रिणींबरोबर केलेल्या धमाल गप्पा।
पुढचं वर्ष पाहूया; म्हणत पुढं ढकललेले प्लॅन्स,
आता अचानक समोर दिसते लाइफची एक्झॅम्स।
हसणं, रडणं, भांडणं – सगळं अनुभवून झालं,
कधीतरी वाटतं, हे वर्ष थांबायला हवं होतं।
आता 'फेअरवेल' च निमंत्रण आहे हाती,
पण मन म्हणतं – "थोडा अजून वेळ द्या मैत्रिणींसाठी।




# मराठी विभागातील उपक्रम

## गुरुपौर्णिमा

गुरु तेथे ज्ञान। ज्ञानी आत्मदर्शन॥






# पर्यावरणाची वारी पंढरीच्या दारी



# श्रावणसरी






# आदिवासी कविता



# मराठी सण सोहळे










# नवदुर्गा : नवविचार - वेध स्त्री मनाचा









# नवदुर्गा : नवविचार - वेध स्त्री मनाचा



रयत समाचार

## नवदुर्गांच्या नवविचारांची रूजवण हीच विद्यार्थिनीना मिळालेली शारदोत्सवाची शिदोरी : प्राचार्य डॉ.अर्चना पत्की

मुंबई । गुरुदत्त वाकदेकर

शारदोत्सव २०२४ नवदुर्गांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानांमुळे नवविचारांची रूजवणच विद्यार्थिनींमध्ये झालेली आहे. ही रूजवण म्हणजेच विद्यार्थिनींना मिळालेली शारदोत्सवाची शिदोरी आहे, असे उद्गार सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम.पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित शारदोत्सव २०२४ नवदुर्गा: नवविचार 'वेध स्त्री मनाचा' या व्याख्यानमालेत प्राचार्य डॉ. अर्चना पत्की यांनी काढले.

सलग नऊ दिवस नऊ वेगवेगळ्या विषयांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. पहिल्या दिवशी पाटी पुस्तक तर दूरच पण अक्षर ओळखही नसलेल्या माऊलीने आशयघन असा खजिनाच महाराष्ट्राला त्यांच्या कवितेच्या माध्यमातून बहाल केला. मानवी जीवनाचे तत्वज्ञान अतिशय साध्या-सरळ भाषेत अतिशय मोजक्या शब्दात बहिणाबाईंनी आपल्या कवितेतून व्यक्त केले. हे व्याख्यान 'प्रतिभावंत बहिणाबाई' हे क.जे. सोमय्या कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. सुचेता नलावडे यांनी मांडले.

'वेदकालीन स्त्रिया' या व्याख्यानात डॉ. गौरी माहुलीकर यांनी स्त्रीची सौम्य, स्वतंत्र, उग्र अशी अनेक रूपे अन्नपूर्णा, दुर्गा, भद्रकाली या स्त्रियांच्या उदाहरणातून दिली. ऋग्वेद काळात स्त्रीला अनेक बाबतीत स्वातंत्र्य होते. धार्मिक यज्ञयागातही स्त्रिया भाग घेत होत्या. वेदकाळात स्त्रीला स्वतंत्र अधिकार होते. असे अनेक विचार त्यांनी आपल्या व्याख्यानातून मांडले.

आकाशवाणी ही भारताच्या विविध प्रदेश, भाषांप्रमाणे अनेक वेगवेगळ्या सेवा पुरविते. 'विविध भारती' ही या सर्व सेवांमधली एक प्रमुख सेवा आहे. सर्वात जास्त व्यावसायिक तसेच सर्वात जास्त प्रसिद्ध सेवा आहे. आकाशवाणी हे मनोरंजनाचे व माहितीचे श्राव्य माध्यम आहे. आजही उत्तम निवेदकाला आणि लेखकाला आकाशवाणीत नवनवीन संधी उपलब्ध आहेत असे विचार तिसऱ्या दिवशी आकाशवाणी कार्यकारी अधिकारी नेहा खरे यांनी 'आकाशवाणी....संवाद संधी' या व्याख्यानात मांडले. स्त्रीदाक्षिण्य म्हणजे नेमके काय हे कोणाला कळले असेल तर ते फक्त छत्रपती शिवाजी महाराज यांना असे मत श्रीमती तेजस्वी बोडके यांनी चौथ्या दिवशी 'शिवरायांचे स्त्रीदाक्षिण्य' या व्याख्यानात मांडले. त्यांनी केसरी सिंह, सखुजीराव बाबाजी पाटील अशी इतिहासातील अनेक उदाहरणे देऊन छत्रपती शिवाजी महाराजांची स्त्रियांविषयीची सन्मानपूर्वक वागणूक कशी होती याचे दाखले दिले.

शारदोत्सवात रूजवण ही विचारांची होणे गरजेचे आहे त्याकरिता मन सजग असणे हे गरजेचे आहे. संवेदनशीलता आणि सहवेदना हे दोन गुण असतील तरच आपण आपल्याबरोबर समाजाचाही विकास करू शकतो. आपण आपल्या भाषेचाही आदर केला पाहिजे. आपली संस्कृती आपणच जपली पाहिजे त्याचबरोबर पर्यावरण जपणे तितकेच गरजेचे आहे. असे सजग विचार पुष्पा आगाशे यांनी पाचव्या दिवशी 'रूजवण' या व्याख्यानात मांडले. सहाव्या दिवशी प्रा. स्नेहा केसरकर यांनी 'स्त्रीशक्तीचा जागर' ह्या व्याख्यानात संतांच्या विचारांचा आढावा घेत संत एकनाथांच्या भारूडांचे सादरीकरण केले. आजही त्या विचारांची काळाला किती गरज आहे हे विद्यार्थिनींना पटवून दिले. 'आजची युवती स्वप्न आणि वास्तव' या व्याख्यानात सातव्या दिवशी डॉ. वंदना निकम चव्हाण यांनी आजची स्त्री ही उद्याचे भविष्य आहे. तुमच्याकडे अमर्याद क्षमता आहे. तुम्ही जगात सकारात्मक बदल घडवून आणू शकता. या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून, तुम्ही तुमचे ध्येय साध्य करू शकता आणि एक यशस्वी आणि अर्थपूर्ण जीवन जगू शकता. सदर व्याख्यानात आजच्या पालकांनी आणि पाल्यांनी कोणत्या विचारांची कास धरणे गरजेचे आहे असे विचार मांडले.

'नॅशनल कॅडेट कॉर्प्सच्या वर्दीपासून ते पोलीस इन्स्पेक्टरची वर्दीपर्यंतचे स्वप्न सत्यात उतरवले. एका खेडेगावातील मुलीचा मुंबईपर्यंतचा प्रवास खडतर होता, परंतु प्रामाणिकपणा आणि शिकत राहण्याची वृत्ती ठेवली तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही. वर्दी ही एक सेवा त्या सेवेत रुजू होण्यासाठी स्वतःला सक्षम बनवा. फक्त घर नाही तर राष्ट्राची, देशाची सेवा आपल्या हातून झाली पाहिजे. स्वतः मधले गुण ओळखा आणि त्या दिशेने स्वतःचा प्रवास घडवा' असे विचार महिला अत्याचार कक्ष विभागाच्या प्रमुख पोलीस इन्स्पेक्टर अपर्णा जोशी यांनी 'वर्दीतील स्त्री' या आठव्या दिवशीच्या व्याख्यानात काढले. सध्या समाजात अनेक सामाजिक आव्हाने आहेत. समाजातील समस्यांबद्दल अधिक जागरूक होऊन एकत्र येणे गरजेचे आहे त्यासाठी स्वयंसेवी संस्था सुरू करा व त्यातून सामाजिक बांधिलकी जपत समाजाचे हित जपा असा संदेश प्रीमस पार्टनर्स लिमिटेडच्या व्यवस्थापन व समाजधुरीणी रसिका भुजबळराव यांनी नवव्या दिवशी 'समाजधुरिणी' या व्याख्यानात दिला.

नवदुर्गा नवविचार 'वेध स्त्री मनाचा' ह्या शारदोत्सव व्याख्यानमालेचे आयोजन मराठी विभागाने केले होते. सदर व्याख्यानमालेस महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.







# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन



# माता जिजाऊ, सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख संयुक्त जयंती



# क्रांतिसूर्य जोतिबा फुले जयंती







# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित
**श्रीमती. मणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय, माटुंगा**

॥ तमसो मा ज्योतिर्गमय ॥

NAAC Reaccredited B++ (CGPA 2.88/4, Cycle III)
Recipient of UGC-CPE Grant (2016-2021),
Adjudged Best College (2017-2018) SNDT Women's University



माझा मराठाचि बोलु कौतुके।
परि अमृतातेहि पैजासी जिंके।
ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन॥

## मराठी विभाग आयोजित
## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा
**१४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२५**

१४.०१.२०२५
**निबंध स्पर्धा**
विद्यार्थिनींचा सहभाग

१५.०१.२०२५
**आत्मकथनातील 'मी' चा प्रवास**
प्रा. प्रदीप पाटील

१६.०१.२०२५
**म्हणी अनुभवांच्या खाणी**
प्रा.नेहा भोसले

१७.०१.२०२५
**प्रेमा तुझा रंग कसा**
नाटकाचे सादरीकरण - चर्चा

१८.०१.२०२५
**मराठी भाषिक कौशल्य विकास**
प्रा. शिल्पा पवार

१९.०१.२०२५
**मराठीतील बोलीभाषा**
डॉ. भटू वाघ (ऑनलाईन)

२०.०१.२०२५
**अभिवाचन स्पर्धा**
विद्यार्थिनीचा सहभाग

२१.०१.२०२५
**लावणी व पोवाडा सादरीकरण**
विद्यार्थिनीचा सहभाग

२२.०१.२०२५
**श्रीमान कादंबरीचे वाचन**
श्री. सतीश जोशी

२३.०१.२०२५
**सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याचा आढावा**
चित्रफित

२४.०१.२०२५
**मराठी असे अमुची अभिजात**
प्रा. प्रतिभा बिश्वास

२५.०१.२०२५
**युनिकोड कार्यशाळा**
श्री. तुषार पवार

२६.०१.२०२५
**देशभक्तापर गीत, कवितांचे वाचन**
विद्यार्थिनीचा सहभाग

२७.०१.२०२५
**पथनाटय कार्यशाळा**
प्रा. जगदीश संसारे

२८.०१.२०२५
**शुद्धलेखन कार्यशाळा**
प्रा.अनिल मांझे

निमंत्रक
**डॉ. अर्चना पत्की**
प्राचार्य

श्रीमती परमेश्वरी देवी गोवर्धनदास गरोडिया एज्युकेशन कॉम्प्लेक्स ३३८, आर.ए. किडवाई रोड, माटुंगा मुंबई - ४०००१९

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा










# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा










# वाचाल तर वाचाल


SMT. MANIBEN M. P. SHAH WOMEN'S COLLEGE OF ARTS AND COMMERCE
(AUTONOMOUS)
RESEARCH CENTRE
MANTHAN




मराठी विभाग व NSS Unit
आयोजित

# शिवजयंती उत्सव सोहळा


















# मराठी भाषा गौरव दिन


N. S. S. Unit
CELL


Center
S. S. Unit
M. P. Shah Women's College
of Arts & Commerce



# विद्यार्थिनींचे कलागुण









# विद्यार्थिनींचे कलागुण












मराठी विभाग प्रकाशित ई-नियतकालिक

# पालवी

## नव चैतन्य

# धन्यवाद

SEVA MANDAL EDUCATION SOCIETY'S
SMT. MANIBEN M.P. SHAH WOMEN'S COLLEGE OF ARTS & COMMERCE (AUTONOMOUS)
NAAC RE-ACCREDITED 'B++' GRADE WITH CGPA 2.88/4
UGC Honor : College with Potential for Excellence

मराठी विभाग, श्रीमती. परमेश्वरी देवी गोरधनदास गरोडिया शैक्षणिक संकुल,
३३८, आर ए किडवाई रोड, माटुंगा (पू), मुंबई ४०००१९

द्वारे प्रकाशित, सर्व कॉपीराइटसह @२०२५